ब्लॉकचेन तंत्रज्ञान प्रकल्प राबविण्याकरिता
प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र. मातंस २०१८/ प्र.क्र. ४५/से-१/का.३९

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक:- १६ ऑगस्ट, २०१९

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. मातंस २०१८/ प्र.क्र. ४५/से-१/का.३९ दिनांक:-११ एप्रिल, २०१९.

२) प्रकल्प अंमलबजावणी समितीची, दि. ६ ऑगस्ट,२०१९ रोजीची बैठक

प्रस्तावना:-

महाराष्ट्र शासन शासकीय कामकाजात ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात अग्रेसर आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान हे उदयोन्मुख तंत्रज्ञान असून त्याचा वापर शासनाची विश्वासार्हता वाढविण्याकरीता व खऱ्या अर्थाने सुधारीत नागरी सेवांचे वितरणासाठी केला जाऊ शकतो. या तंत्रज्ञानामध्ये नागरी सेवा वितरण करण्याची खूप क्षमता असून माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने त्याचा वापराकरिता शासकीय कामकाजातील चालू प्रकरणांची निवड करून वाटचाल सुरू केली आहे. पुरवठा साखळी (Supply Chain), कृषी विपणन (Agriculture Marketing), वाहन नोंदणी (Vehicle Registration), आणि दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली (Document management System) या क्षेत्रातील सेवा ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे करण्याचे काम माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून करण्यात येणार आहे. या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१. माहिती तंत्रज्ञान संचलनालयाकडून ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचे शासकीय कामकाजात वापर करण्याच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करून घेण्यात आला असून त्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. या शासन निर्णयाद्वारे सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाकरिता, शासकीय कामकाजात ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालय ही अंमलबजावणी करणारी संस्था असेल.

२. ब्लॉकचेन प्रकल्पाअंतर्गत Sand Box तयार करणे, प्रकल्प विकसित करणे, ब्लॉकचेनच्या वापरासाठी शासनातील चालू प्रकरणांचा उपयोग करणे, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची चाचणी मर्यादित वातावरणात करणे आणि प्रकल्प व्यवस्थापन युनिटची (Project Management Unit) नियुक्ती करणे इत्यादी बाबी समाविष्ट असतील. पुरवठा साखळी (Supply Chain), कृषी विपणन (Agriculture Marketing), वाहन नोंदणी (Vehicle Registration), आणि दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली (Document

management System) इत्यादी क्षेत्रातील प्रकल्पामध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करणे व त्याला स्थिरता देण्याचे काम प्रकल्प व्यवस्थापन युनिट यांच्याकडून करण्यात येईल.

३. सविस्तर प्रकल्प अहवालात (Detailed Project Report) ब्लॉकचेन आर्किटेक्चर, नोड्सची निवड, नियोजन, निर्णय, सॅन्ड बॉक्स तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे या बाबीचा अंतर्भाव आहे. रचना प्रकल्पाची अंमलबजावणीकरिता विहित पध्दतीचा अवलंब करून सल्लागाराची नियुक्ती करण्यात येईल.

४. या प्रकल्पाकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रु. १० कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. दि. ०३ ऑगस्ट, २०१९ रोजी झालेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या बैठकीत सद्यस्थितीत प्रकल्पाकरिता रु. ४.८ कोटी इतक्या खर्चास मंजूरी देण्यात आली आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०८१६१७५७५६०४११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

S V R Srinivas

Digitally signed by S V R Srinivas
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DIT(GAD), postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=31d35fda97cba0c6a6c5e2ca7125fd8ba7f7201a47f0e71dbf230047862bd061, serialNumber=914d8a9c1092ca4b44280033c71560ea75b2d56dcb4d3fc1f81eb6dfc5fcbe63, cn=S V R Srinivas
Date: 2019.08.16 18:02:43 +05'30'

(एस. व्ही. आर. श्रीनिवास)
प्रधान सचिव (मातं)

प्रत,

१) सर्व सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्यसचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) प्रधान सचिव (मातं), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) संचालक,माहिती तंत्रज्ञान संचालनालय,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) आयुक्त (परिवहन) नवीन प्रशासन भवन, ४ था मजला, रुम नं. १३, डॉ. बाबसाहेब आंबेडकर उद्यान, शासकीय वसाहत, वाद्रे, मुंबई- ४०००५१.
५) सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, जी.टी. रुग्णालय, नविन मंत्रालय, मुंबई-४००००१.
६) सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८) संचालक, राष्ट्रीय आरोग्य संचालनालय, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, ३रा मजला, सेंन्ट जॉजस कंपाऊड, पि डिमेलो रोड, मुंबई-४००००१.
९) संचालक, भूमि अभिलेख,डी.डी बिल्डींग, खोली क्र-१०८, पहिला मजला,जूने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,मुंबई-४०००२३.
१०) संचालक, भूमि अभिलेख (उपनगर),प्रशासकीय इमारत,१० वा मजला, शासकीय वसाहत, चेतना कॉलेज जवळ, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.

११) संचालक भूमि अभिलेख, १०६, एसव्ही रोड, एलआयसी कॉलनी, सुरेश कॉलनी, विलेपार्ले (प), मुंबई-४०००५१.

१२) शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्वे नं ८३२ -अ,फायनल प्लॉट नं. १७८ व १७९, भांभूरडा शिवाजी नगर,पुणे-४११००४.

१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाआयटी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड,मुंबई.४००००५

१४) राज्य सूचना विज्ञान अधिकारी,नॅशनल इंफोरमॅटीक सेंटर, मुंबई.३२

१५) प्रधान सचिव (मातं), यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१६) संचालक (मातं), यांचे स्वीय सहायक,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१७) निवड नस्ती.